महाराष्ट्र शासन

महत्वाचे/ कालमर्यादा

क्र.कॅमाअ २००७/प्र.क्र.३१/आस्था-२,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२.
दिनांक : १९ फेब्रुवारी,२००७.

प्रति,

सर्व सह सचिव /उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
सर्व संचालक,
सर्व कुलसचिव (कृषितर विद्यापीठे),
कार्यालयीन सचिव, शिक्षण शुल्क व प्रवेश नियंत्रण समिती, बांद्रे (पू.), मुंबई-५१.
राज्य संपर्क व विशेष कार्य अधिकारी, राष्ट्रीय सेवायोजना कक्ष, मुंबई-१.
सर्व अवर सचिव/ कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग.

विषय.- केंद्र शासनाच्या माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीनुसार कार्यवाही करणे व कार्यवाहीचा अहवाल शासनास सादर करणे

संदर्भ:- १) सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्र.कॅमाअ २००५/प्रक्र.४३०/०५/५, दि.२०.१.२००६.
२) या विभागाचे पत्र क्र.संकीर्ण १००६/(४०/०६)/आस्था-२, दि.२.३.२००६.
३) सर्व संचालक व कृषितर विद्यापीठांना पाठविलेली अ.शा.पत्रे क्र.संकीर्ण १००६/(८७/०६)/आस्था-२, दि.८.९.२००६, ६.१०.१००६, १.११.२००६ व २७.१२.२००६.
४) या विभागाचे पत्र क्र.कॅमाअ २००६/प्र.क्र.१८७/०६/आस्था-२, दि.१३.१०.२००६.

महोदय/महोदया,

केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम हा दि. १२.१०.२००५ पासून अंमलात आलेला आहे. या अधिनियमातील कलम २(ज) अन्वये "सार्वजनिक प्राधिकरणे" याचा अर्थ स्पष्ट करण्यात आलेला असून यामध्ये मंत्रालयीन विभाग व विभागाच्या अधिपत्याखालील सर्व सार्वजनिक प्राधिकरणे, संचालनालये, विद्यापीठे, कार्यालये, मंडळे, महामंडळे, समित्या व संस्था यांचा समावेश होतो. या सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी कलम २(झ) अन्वये विहित केलेले अभिलेख, सर्व दस्तऐवज, नस्त्या इ. बाबी तातडीने सूचीबध्द व अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी तत्परतेने करावी जेणेकरुन, या अधिनियमान्वये मागविलेली माहिती जनतेस सहजगत्या व त्वरेने उपलब्ध करणे सुलभ होईल.

२. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ४(१) अन्वये सर्व अभिलेख सूचीबध्द करणे, निर्देशसूची तयार करणे, सर्व अभिलेखांचे संगणकीकरण करणे व संपूर्ण देशातील विविध प्रणालींमध्ये नेटवर्क मार्फत ते जोडले जात आहेत याची सुनिश्चिती प्रत्येक कार्यालयाने/ सार्वजनिक

(2)

प्राधिकरणाने करावयाची आहे. त्याचप्रमाणे कलम ४(ग) अन्वये विहित केलेल्या १७ बाबी प्रसिध्द करणे व त्यानंतर दरवर्षी त्या अद्ययावत करणे बंधनकारक असून सदर बाबी संकेतस्थळावर/ वेबसाईटवर प्रसिध्द करणे व ती अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने याबाबत कार्यवाही करुन या विभागास वेबसाईटच्या तपशिलासह तातडीने अवगत करावे.

३. प्रस्तुत अधिनियमांतर्गत या विभागातर्फे दि.३१.८.२००५ व तदनंतर दि.५.१०.२००६ च्या आदेशान्वये विभागातील जास्तीत जास्त अधिकाऱ्यांना "माहिती अधिकारी" पदी पदनिर्देशित करण्यात आले असून संबंधित सह सचिव/ उप सचिव यांना "अपिलीय प्राधिकारी" या पदावर निर्देशित करण्यात आले आहे. याच धर्तीवर आपल्या कार्यालयात आवश्यकतेप्रमाणे "माहिती अधिकारी" व "अपिलीय प्राधिकारी" यांना नियुक्त करण्यात येऊन जनतेस त्यांची नांवे व माहिती सहजगत्या कळेल अशा पध्दतीने प्रसिध्द करण्यात यावी. या अनुषंगाने असेही आपणास कळविण्यात येते की, मा.मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांनी एका प्रकरणी असे निदेश दिले आहेत की, सार्वजनिक विश्वस्त अधिनियम किंवा तत्सम कायद्यान्वये स्थापित संस्थांसंदर्भात माहिती अॅकॅडमीक (Academic) स्वरुपाची असेल तर संबंधित "प्राचार्य" हे माहिती अधिकारी असतील व संबंधित "उप संचालक/ सह संचालक, प्रादेशिक विभाग" हे प्रथम अपिल अधिकारी असतील तर संस्थेच्या कामकाजाशी निगडीत माहिती विचारली असेल त्या वेळेस "सचिव" हे माहिती अधिकारी व संस्थेचे "चेअरमन" हे प्रथम अपील अधिकारी असतील.

४. या अधिनियमाच्या कलम २५(१) अन्वये राज्य माहिती आयोगाने प्रत्येक वर्ष समाप्त झाल्यावर या अधिनियमातील तरतुदींची, त्या वर्षातील अंमलबजावणीबाबतचा अहवाल तयार करुन त्याची प्रत समुचित शासनाला पाठविणे आवश्यक आहे. तदनुषंगाने मंत्रालयीन विभागाने विभागाच्या अधिपत्याखालील सर्व सार्वजनिक प्राधिकरणासंबंधी माहिती संकलित करुन, ती राज्य माहिती आयोगास उपलब्ध करणे आवश्यक आहे.

५. राज्य माहिती आयोगास उपलब्ध करावयाच्या माहितीबाबतची विवरणपत्रे सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधीन दि.२०.१.२००६ च्या परिपत्रकान्वये विहित केली असून ती संदर्भाधीन पत्रान्वये सर्वांना पाठविण्यात आली आहे. विभागाच्या अधिपत्याखालील शैक्षणिक संस्था, कार्यालये, सार्वजनिक प्राधिकरण इ. बाबतची माहिती तसेच माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी नियुक्त झाल्याबाबतची माहिती (पदनाम व पत्त्यासहीत यादी व दूरध्वनी संख्या) एकत्रित करुन राज्य माहिती आयुक्त व सामान्य प्रशासन विभागाला पाठवावयाची असून या अधिनियमाच्या कार्यक्षेत्रात असणाऱ्या सर्व सार्वजनिक प्राधिकरणांतर्फे जन माहिती अधिकारी/ सहाय्यक जन माहिती अधिकारी/ अपिलीय प्राधिकारी, पदनिर्देशित झाले असल्याची मंत्रालयीन विभागाने खात्री करुन तसे <u>प्रमाणपत्र</u> विभागाच्या प्रधान सचिवांच्या स्वाक्षरीने सामान्य प्रशासन विभागाला पाठवावयाचे आहे. विभागाच्या दि.२.३.२००६ तसेच दि.१३.१०.२००६ च्या पत्रान्वये, उपरोक्त माहिती मागविण्यात आली असता काही कार्यालयांची माहिती प्राप्त झालेली आहे. तथापि ती परिपूर्ण नसल्याचे दिसून आले आहे. तरी आपली परिपूर्ण व अद्ययावत माहिती तातडीने विभागास सादर करण्यात यावी जेणेकरुन, सदर माहिती व प्रमाणपत्र विभागास त्वरेने राज्य माहिती आयोग व सामान्य प्रशासन विभागास सादर करणे शक्य होईल.

६. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदींनुसार सामान्य प्रशासन विभागाने दि.२०.१.२००६ च्या परिपत्रकान्वये विहित केलेल्या ५ विवरणपत्रांतील माहिती दरवर्षी, विभागाची व त्याच्या अधिपत्याखालील सर्व सार्वजनिक प्राधिकरणांची मिळून एकत्रित, राज्य माहिती आयोग व सा.प्र.विभागास पाठवावयाची आहे. या अधिनियमानुसार विभागाशी संबंधित सर्व कार्यालये त्याचप्रमाणे (या अधिनियमातील तरतुदींच्या अनुषंगाने) सर्व शैक्षणिक संस्था, यांनी दर अहवाल विवरणपत्रातील माहिती प्रशासकीय विभागास उपलब्ध करणे आवश्यक आहे.

७.१. विभागाच्या अधिपत्याखालील सर्व सार्वजनिक प्राधिकरणांची माहिती यापूर्वी विभागास प्राप्त न झाल्याने फक्त विभागाची माहिती, राज्य माहिती आयोगाला व सामान्य प्रशासन विभागाला सादर केली असता राज्य माहिती आयोगाने तसेच सामान्य प्रशासन विभागाने ती विभागास परत केली असून सर्व सार्वजनिक प्राधिकरणांची माहिती विभागाच्या माहितीसह विहित विवरणपत्रात दोन प्रतींमध्ये विहित मुदतीमध्ये पाठविण्याबाबत निर्देशित केलेले आहे. तरी, याची गंभीर नोंद घेण्यात यावी व आपली माहिती विहित मुदतीत आता ४ (चार) प्रतींमध्ये या सर्वसाधारण विभागास पाठविण्यात यावी.

७.२. अशा या अधिनियमान्वये पाठवावयाची विहित विवरणपत्रातील माहिती फक्त विभागाचीच (स्वत:) पातळीपर्यंतची नसून संबंधित विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व सार्वजनिक प्राधिकरणांची माहिती एकत्रित स्वरूपात, राज्य माहिती आयोगास तसेच सामान्य प्रशासन विभागास २ प्रतीत दरमहा विहित कालावधीत पाठविणे आवश्यक आहे.

७.३. विभागाच्या अधिपत्याखालील सर्व सार्वजनिक प्राधिकरणांची खूप मोठ्या प्रमाणावरील संख्या लक्षात घेता त्यांनी त्यांची माहिती दरमहा सादर करणे, ती सर्व विभाग प्रमुख अथवा त्यांच्या प्रादेशिक उप विभाग प्रमुखांना प्राप्त होणे, त्यांच्याकडून शासनास प्राप्त होणे व विभागाच्या समन्वय कक्षाकडून राज्य माहिती आयोगास तसेच सामान्य प्रशासन विभागास माहिती सादर करणे हे प्रत्यक्षात विहित कालावधीत शक्य होत नसल्याचे दिसून आले आहे. म्हणून या प्रकरणी विहित विवरणपत्रातील माहिती सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी दरमहा खाली नमूद केलेल्या तारखेपूर्वी/ पर्यंत शासनास सादर करण्याबाबत पुढीलप्रमाणे बंधन घालून देण्यात येत आहे:-

(१) सर्व संचालनालयांच्या अधिपत्याखालील सह/ उप संचालकांच्या कार्यक्षेत्रातील या विभागाशी निगडीत व अधिपत्याखालील तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदींच्या अनुषंगाने संबंधित प्रत्येक शैक्षणिक संस्था/ सार्वजनिक प्राधिकरण यांनी विहित विवरणपत्र क्र.१ ते ५ मधील प्रत्येक महिन्याची माहिती पुढील महिन्याच्या ३ तारखेपर्यंत सह/ उप संचालक यांच्या कार्यालयाकडे पोहोचती करावी.

(२) सर्व सह/ उप संचालकांनी त्यांच्या कार्यालयासह सर्व सार्वजनिक प्राधिकरणांची सिनापूक व एकत्रित माहिती संचालकांकडे ५ तारखेपूर्वी पोहोचती करावी.

(३) संचालकांनी त्यांच्या कार्यालयासह सह/ उप संचालक कार्यालयांकडून प्राप्त झालेली एकत्रित माहिती ७ तारखेपर्यंत मंत्रालयीन प्रशासकीय विभागास (कार्यासन आस्था-२) पोहोचती करावी.

(४) विद्यापीठांच्या कुलसचिवांनी विद्यापीठांतर्गत सर्व विभागांनी एकत्रित माहिती ७ तारखेपर्यंत मंत्रालयीन प्रशासकीय विभागास (कार्यासन आस्था-२) पोहोचती करावी.

(५) विभागाच्या सर्व माहिती अधिकाऱ्यांनी विहित विवरणपत्र-१ मधील माहिती त्याचप्रमाणे विभागातील सर्व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी विहित विवरणपत्र क्र.२, ३, ४ व ५ मधील त्यांच्या अधिपत्याखालील कार्यासनांशी निगडीत माहिती एकत्रित संकलित करून ती दर महिन्याच्या ७ तारखेपर्यंत कार्यासन आस्था-१ यांना पोहोचती करावी.

(६) या विभागाशी संबंधित समित्या, राष्ट्रीय सेवा योजना कार्यालय इत्यादी संबंधित सार्वजनिक प्राधिकरणांची माहिती संबंधित जन (शासकीय) माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दरमहा विहित विवरणपत्रांत ७ तारखेपर्यंत विभागाच्या आस्था-१ कार्यासनास पोहोचती करावी.

८. उपरोक्त विहित केलेल्या कालावधीत प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने माहिती सादर करणे बंधनकारक असून अशी माहिती प्राप्त झाल्यावरच राज्य माहिती आयोग व सामान्य प्रशासन विभागास विहित कालावधीत एकत्रितरित्या दरमहा सादर करणे विभागास शक्य होणार आहे. यासाठी सर्व संबंधितांनी कटाक्षाने नमूद केलेल्या तारखेपूर्वी माहिती, संबंधितांस पोहोचती करण्याची दक्षता घ्यावी. मात्र जे माहिती अधिकारी/ अपिलीय प्राधिकारी विहित कालावधीत माहिती दरमहा उपलब्ध करून देणार नाहीत त्यांच्या विरुध्द कडक कारवाई करण्यात येईल असेही कळविण्यात येत आहे.

९. प्रत्येक जन (शासकीय) माहिती अधिकाऱ्याने तसेच अपिलीय प्राधिकाऱ्याने विहित विवरणपत्रातील आकडेवारी व माहिती अचूक व योग्य असल्याची खात्री करावयाची आहे. आतापर्यंत विभागास प्राप्त झालेली आकडेवारी पाहता त्यात नमूद केलेली मागील महिन्यातील प्रलंबित अर्जांची संख्या, अहवालाच्या महिन्यात प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या, निकाली काढलेल्या अर्जांची संख्या व प्रलंबित अर्जांची संख्या यांचा ताळमेळ जुळत नाही. ही आकडेवारी चुकीची दिल्याचे आढळून आले आहे. इतकेच नव्हे तर मागील महिन्यातील प्रलंबित संख्या व चालू महिन्याच्या सुरुवातीची संख्या ही आकडेवारीही जुळत नसल्याचे दिसून आले आहे. म्हणजेच विभागास आकडेवारी पाठवितांना ती अचूक असल्याची काळजी घेण्यात आलेली नव्हती हे स्पष्ट होते. चुकीच्या अथवा न जुळणाऱ्या आकडेवारीमुळे राज्य माहिती आयोग व सामान्य प्रशासन विभाग सदर माहिती नाकारतात अथवा स्विकारत नाहीत व यास सर्वस्वी चुकीची माहिती देणारे अधिकारी जबाबदार ठरतात. सबब, ही खेदजनक परिस्थिती टाळण्यासाठी विहित विवरणपत्रातील आकडेवारी/ माहिती पाठवितांना ती अचूक/ योग्य असल्याची खात्री करून संबंधित माहिती/ अपिलीय अधिकाऱ्यांनी स्वाक्षरी करून विहित कालावधीपूर्वी वर नमूद केल्याप्रमाणे सादर करावयाची आहे.

१०. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार वरील नमूद केलेल्या बाबींची विहित कालावधीत पूर्तता करणे आवश्यक आहे. तरी उपरोक्त नमूद केलेल्या प्रत्येक बाबींसंदर्भात आवश्यक ती कार्यवाही त्वरेने करून शासनास माहिती विहित मुदतीत सादर करण्याची दक्षता संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाच्या सर्व संबंधितांनी घ्यावी व तशा प्रकारच्या सूचना सार्वजनिक प्राधिकरणांच्या प्रमुखांनी सर्वांना द्यावी ही विनंती.

आपला विश्वासू,

(प्र.म.दगडे)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत अग्रेषित,

उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील सर्व सह /उप संचालक यांना विनंती की, त्यांच्या कार्यक्षेत्रातील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अनुषंगाने सर्व संबंधित शैक्षणिक संस्था/ महाविद्यालये /औद्योगिक प्रशिक्षण संस्था/ तंत्रनिकेतने /ग्रंथालये/ सार्वजनिक प्राधिकरण इ. यांना या पत्रातील नमूद बाबींसंदर्भात तात्काळ व नियमितरित्या विहीत कालावधीत कार्यवाही करण्याबाबत व अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात यावे. आपणाकडून सर्व संबंधित सार्वजनिक प्राधिकरणांची एकत्रित माहिती विहीत कालावधीपूर्वी संबंधित संचालकांस पोहोचती करण्याची जबाबदारी आपली आहे याची कृपया नोंद घ्यावी व पत्रातील सर्व सूचनांचे काटेकोरपणे पालन होईल याची दक्षता घ्यावी.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

जा.क्र. तंशिविका/पु/माअ-२००५/२२७०

दिनांक - 6 MAR 2007

सर्व संलग्नीत संस्था प्रमुखांना कळविण्यात येते की, उपरोक्त शासन निर्णयाचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे व विभागीय कार्यालयास अहवाल सादर करावा.

सहसंचालक,

तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय.